देशदूत

13 JAN 2023

# मकरसंक्रांती-भोगी हा दिवस पौष्टिक तृणधान्य दिन म्हणून जाहीर

▶▶ जळगाव । प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष, २०२३ म्हणून घोषित केले आहे. या वर्षाच्या निमित्ताने मकर संक्रांती-भोगी हा सणाचा दिवस पौष्टिक तृणधान्य दिन म्हणून कृषि विभागामार्फत राज्यात साजरा करण्यात येणार आहे अशी माहिती कृषि उपसंचालक अनिल भोकरे यांनी दिली. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्ताने कृषि विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून सर्वसामान्य नागरीकांपर्यंत पौष्टिक तृणधान्य पिकांचे आहारातील महत्व, त्याचे फायदे याबरोबरच तृणधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढ कार्यक्रम हाती येणार आहे. या दिनाचे औचित्य साधून प्रत्येक कृषि सहाय्यक त्यांचेकडील गावांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम, आरोग्यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन, तृणधान्य पिकांच्या विविध जाती, त्यांचे लागवड तंत्रज्ञान, तृणधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा, मुलाखती, तृणधान्य पिकांपासून बनवण्यात येणारे विविध उपपदार्थ यांची माहिती देण्यासाठी प्रगतीशील शेतकरी, आहारतज्ञ, विद्यापीठांचे शास्त्रज्ञ यांना निमंत्रीत केले आहे. सहभागी होण्याचे आवाहन कृषि उपसंचालक अनिल भोकरे यांनी केले आहे.

**कृषि विभागातर्फे आयोजन**